अमृतवेल

# मनी प्लस

May 2017 / ₹ : 100/-

www.amrutwelmedia.com





## Maxell

Maharashtra Corporate Excellence Awards

EXCELLENCE IN
ENTREPRENEURSHIP,
BUSINESS LEADERSHIP,
& INNOVATIONS



मॅक्सेल पुरस्काराच्या सहाव्या पर्वाचे प्रमुख पाहुणे सॅम पित्रोदा, ट्रस्टी व ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, मॅनेजिंग ट्रस्टी नितीन पोतदार तसेच पुरस्काराचे मानकरी (डावीकडून) संजय वोरकर, संतोष शिंदे, डॉ. अविनाश फडके, अशोक जैन, किरण कर्णिक, चेतना पवार, चित्रा मेटे.



कुमार केतकर,
ज्येष्ठ संपादक

तसे पाहिले तर जगात व देशात एक अस्वस्थता आणि अनिश्चितता दिसते. त्यामुळे भले भले निराशेच्या गर्तेत जाताना दिसतात. परंतु सॅम पित्रोदांचे वैशिष्ट्य म्हणजे ते उदंड व दुर्दम्य आशावादी आहेत. त्या आशावादाला उभारी देणे हे मॅक्सेल पुरस्कारांचे एक उद्दिष्ट आहे. ३० वर्षांपूर्वी पित्रोदांनी भारतात नवे पर्व सुरू केले. त्यावेळी टेलिफोन दुर्मीळ होते, रंगीत टीव्ही अगदी कमी होते आणि कॉम्प्युटर नुकतेच आले होते, इंटरनेट, ई-मेल, गुगल काहीच नव्हते. ते सर्व भारतात आणण्यासाठीची तांत्रिक आणि सामाजिक नेपथ्यरचना आणि मानसिकता सॅम यांन रुजवली. मॅक्सेलच्या उपक्रमामागे हेच सूत्र असेल. वैज्ञानिक आधुनिकता आणि गांधीजींनी रुजवलेली मूल्ये....



नितीन पोतदार, कॉर्पोरेट लॉयर
संस्थापक-विश्वस्त,
मॅक्सेल फाऊंडेशन

मॅक्सेलने सहा वर्षांत ५० व्यक्ती व संस्था यांचा तंत्रविकास, तंत्रनिर्मिती, उद्यमशीलता, उद्योगविस्तार व विकास, सर्जनशीलता, सामाजिक व सांस्कृतिक भान आणि कलाविषयक जाणिवा लक्षात घेऊन खास पुरस्काराने गौरव केला आहे; आणि आता तर शालेय मुलांपर्यंत उद्यमशीलता पोहोचावी म्हणून 'मॅक्सप्लोअर' उपसंस्थाही सुरू केली आहे. नामवंत कॉर्पोरेट कन्सल्टंट म्हणून ओळख असलेले पोतदार सॅम पित्रोदा यांचे स्वागत करताना म्हणाले, मॅक्सेलचे व पुरस्कार विजेत्यांचे हे भाग्य आहे की अशी जगद्विख्यात व्यक्ती या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित आहे. भारतात माहिती-माध्यम क्रांती घडवून आणणारे आणि टेलिकॉम ते मोबाईल ते इंटरनेट या विश्वात आणणारे पित्रोदा हे आजही गांधीवादी विचारसरणीचे आग्रही पुरस्कर्ते आहेत.

## 'एक्सलन्स इन एंटरप्रेन्युअरशिप पुरस्कार



श्री. अशोक जैन, चेअरमन, जैन इरिगेशन सिस्टिम्स लिमिटेड, जळगाव

जगभरात मिळून एकूण ३० ठिकाणी कंपनीचे उत्पादनाचे कारखाने व त्यातून १०० कोटी डॉलर्सचे उत्पन्न मिळविणारी जैन इरिगेशन सिस्टिम्स लिमिटेड ही भारतातील एक प्रख्यात कंपनी. त्यांच्या पथदर्शी ठिबक सिंचन पद्धतीमुळे दुष्काळप्रवण भागातील शेतकऱ्यांना आपल्या उत्पादनात जास्तीत जास्त वाढ करता आली. या दूरदर्शी कंपनीच्या प्रमुखपदी श्री. अशोक जैन आहेत. १९८९ मध्ये ते कंपनीत रुजू झाले, तेव्हापासून कंपनीच्या व्यवसायाला गतिमान वृद्धीकडे नेले आहे. सूक्ष्म ठिबक सिंचन पद्धतीशिवाय, पाइप्स, पायाभूत सुविधा, शाश्वत ऊर्जा, प्रक्रिया केलेली कृषी उत्पादने, टिश्यू कल्चर प्लांट, वित्तीय सेवा व कृषी निविष्ठाविषयक इतर सेवा याही जैन इरिगेशन सिस्टिम्सतर्फे दिल्या जातात.

## एक्सलन्स इन बिझनेस लीडरशिप पुरस्कार

एसआरएल डायग्नॉस्टिक या भारतातील सर्वात मोठी डायग्नॉस्टिक लॅबोरेटरीचे नेतृत्व करणारे डॉ. अविनाश फडके. त्यांना सतत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अधिस्वीकृती मिळत असते. त्यांच्या नेतृत्वाखाली एसआरएल डायग्नॉस्टिकने २०१५ साली सिक्स सिग्मा हेल्थकेअर एक्सलन्स पुरस्कारांचा सर्वोत्कृष्ट डायग्नॉस्टिक सेवा देणारी संस्था हा पुरस्कार पटकावलेला आहे. जगातील सर्वात महान ब्रँड व नेतृत्व याबाबतचा २०१५ सालचा आशिया व गल्फ कॉर्पोरेशन कौन्सिलचा पुरस्कारही त्यांना मिळालेला आहे. त्यांनी अनेक संशोधनपर पेपर्स लिहिलेले असून ते राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रकाशित झालेले आहेत. ४०० पेक्षा जास्त परिषदांमध्ये त्यांचा सहभाग होता.



डॉ. अविनाश अच्युत फडके, एम.डी., डी.पी.बी. प्रेसिडेंट व मेंटर, सुपर रेलिगेअर लॅबोरेटरीज लिमिटेड




## जैन ठिबक केवळ पाण्याची बचत करते एवढंच नव्हे तर उत्पादनही वाढवते... आणि त्यातील साखरेचा उताराही!!

पाण्याची अचूक मात्रा - हवी तेव्हां, हवी तितकीच ऊसाच्या थेट मुळाशीचं देऊन सतत वाफसा स्थिती राखणारी केवळ हीच एकमेव पद्धत आहे.

## उसासाठी जैन ठिबक वापरण्याचे फायदे !

- आपल्या जमिनीमधील ओलाव्याचे (वाफसाचे) प्रमाण अगदी सुयोग्य राखते.
- पारंपरिक सिंचनाच्या तुलनेत पीक लवकर हाती येते.
- मजुरीच्या खर्चातही बचत.
- लोडशेडींगमध्ये सुद्धा उसाला पाणी देणे सोयीचे.
- ऊसासाठी सरफेस व सबसरफेस सिंचन प्रणाली उपलब्ध.
- शेतक-यांच्या व पिकांच्या गरजेप्रमाणे सिंचन प्रणाली देणारी भारतातील एकमेव कंपनी.

जैन ठिबक सिंचन संचाचा व लाभधारक शेतक-याचा कंपनीतर्फे १ वर्षाचा विमा* मोफत !



जैन ठिबक
पाणी थेंबानं. पीक जोमानं!®

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापारी. ब्रह्मांडाचा भेद करी.®

फोन : ०२५७ - २२५८०११; फॅक्स: ०२५७- २२५८१११; ई-मेल: jisl@jains.com वेबसाईट: www.jains.com

कार्यालये : अहमदनगर : ९४२२७७२२४८, अकोला: ९४०३०८०१३२, ९४०३६९५८३७, अमरावती : ९४०३६९५८५६, ९४२२७७६८०५, औरंगाबाद : ९४२२७७४९१२, बीड : ९४२२७७६८२७, बुलढाणा : ९४२२२८३४२४, जळगाव : ९४२२७७४९१८, ९४२२७७४९८१, ९४२२७७४९८६, जालना: ९४२२७७५९१२, कोल्हापूर : ९४२२७७२२५२, लातूर : ९४२२७७३३८९, नागपूर : ९४२२२८३४०८, ९४०३०८०१७१,९४२२७७६८३३, नांदेड : ९४०३०८०१०९, , नंदुरवार :९४०३७७०६२१, नाशिक : ९४२२७७४९१६, ९४०३७७०६२५, पंढरपूर : ९४२२७७३३९०, पुणे : ९४२२२८३४२९, यवतमाळ: ९४२२७७५९०९, रत्नागिरी : ९४२२२९२१०८, वर्धा: ९४२२७७४९२७,९४०३६९५८९०, सांगली : ९४०३७७०६००, ९४२२७७४९७६, सातारा : ९४२२७७४१८६, सोलापूर : ९४०३६९५८८६, ९४२२७७६८२६. ठाणे: ९८७०९९०७५४.

सिंचनाची सर्व साधने एकाच छताखाली बनवणारी जगातील एकमेव अग्रगणी कंपनी !

# अमेरिकेत जैन इरिगेशन प्रथम क्रमांकावर



**सेवा, गुणवत्ता आणि उच्च तंत्रज्ञानाच्या बळावर आज अमेरिकेत जैन इरिगेशन क्रमांक १ वर पोहोचली. जागतिक विस्ताराच्या भक्कम पायावरच आता जैन इरिगेशनला अमेरिकेतील ॲग्री व्हॅली इरिगेशन (एव्हीआय) आणि इरिगेशन डिझाईन अँड कन्स्ट्रक्शन (आयडीसी) या दोन महत्त्वपूर्ण कंपन्यांचे अधिग्रहण करता येणे शक्य झाले.**

जैन इरिगेशन सिस्टिम्स लिमिटेडने त्यांच्या अमेरिकेतील (यूएस) उपकंपनीच्या माध्यमातून दोन मोठ्या सिंचनप्रणीत कंपन्यांचे ८० टक्के भागभांडवल खरेदी करून अधिग्रहण केले आहे. अमेरिकेतील ॲग्री व्हॅली इरिगेशन (एव्हीआय) आणि इरिगेशन डिझाईन अँड कन्स्ट्रक्शन (आयडीसी) या सूक्ष्मसिंचन क्षेत्रातील सर्वात मोठ्या वितरक कंपन्या म्हणून ओळखल्या जातात. या दोन्ही कंपन्यांमध्ये केलेल्या गुंतवणुकीनंतर एक स्वतंत्र नवीन वितरण कंपनी जैन इरिगेशन स्थापन करणार आहे. याद्वारे अमेरिकेतील शेतकऱ्यांना जैन इरिगेशनच्या अत्याधुनिक उच्च कृषी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अधिक नावीन्यपूर्ण असे उच्च कृषी तंत्रज्ञान, त्याचे आरेखन, सेवा व उभारणी दिली जाईल व यातून त्यांना मोअर क्रॉप पर ड्रॉपची अनुभूती घेता येईल.

जागतिक सिंचन बाजारपेठेतील जैन इरिगेशनची ही एक धोरणात्मक सर्वात मोठी गुंतवणूक ठरली आहे. जैन इरिगेशन इन कार्पोरेटेड या अमेरिकेतील कंपनीद्वारे यापूर्वीच जैन इरिगेशनने आपले भक्कम अस्तित्व तेथे निर्माण केले आहे. कॅलिफोर्निया येथील फ्रेस्नोमध्ये मुख्यालयातून तेथील कामकाज पाहिले जाते. कॅलिफोर्नियात असलेल्या दुष्काळाची तीव्रता सध्याच्या पावसामुळे कमी झाली आहे. यामुळे जैन इरिगेशन नव्या विलीनीकरण झालेली कंपनीद्वारे सिंचन व्यवसायाची खूप मोठी बाजारपेठ येत्या १८ ते २४ महिन्यांत काबीज करेल. या विलीनीकरणामुळे जैन इरिगेशनला पुरवठा साखळी एकत्रित करण्यात मदत होईल तसेच शेतकऱ्यांसोबत थेट संबंध प्रस्थापित करता येतील. या कंपनीच्या एकात्मिक प्रकल्प उभारणीच्या अद्वितीय कौशल्यामुळे कंपनीला टर्नकी प्रोजेक्टच्या नियोजनापासून ते उभारणीपर्यंतचा सहभाग वाढवता येईल. या विलीनीकरणास कोणत्याही सरकारी किंवा संस्थांच्या मान्यतांची आवश्यकता नाही. हा व्यवहार पुढील काही आठवड्यात पूर्णत्वास येईल. ◆◆



जैन इरिगेशनचे संस्थापक भंवरलालजी जैन यांनी भारतीय शेतकऱ्यांसमवेत संपूर्ण जगातील कृषी व शेतकऱ्यांच्या उज्ज्वल भविष्याचा वेध घेतला होता. १९८५ मध्ये त्यांनी अमेरिकेतील फ्रेस्नो या शहरात कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने पहिल्यांदा पाऊल ठेवले. त्यानंतर १९८६ मध्ये जैन इरिगेशनने प्रकल्प सुरू केला. त्यावेळी ही भारतीय कंपनी काय करेल असे प्रश्न उपस्थित करून अनेकांनी भंवरलालजींना वेड्यातही काढले होते. सेवा, गुणवत्ता आणि उच्च तंत्रज्ञानाच्या बळावर आज अमेरिकेत जैन इरिगेशन क्रमांक १ वर पोहोचली. त्यांनी साध्य केलेल्या जागतिक विस्ताराच्या भक्कम पायावरच आता जैन इरिगेशनला अमेरिकेतील या दोन महत्त्वपूर्ण कंपन्यांचे अधिग्रहण करता येणे शक्य झाले. कृषी क्षेत्राबद्दलची ही कटिबद्धता आम्हाला आणखी दृढ करता आली याचा निश्चितच आनंद आहे. या अधिग्रहणातून जागतिक पातळीवर आघाडीवर असलेल्या जैन इरिगेशनचे उच्च कृषी तंत्रज्ञान अधिक भक्कम झाले आहे.

– **अशोक जैन**, अध्यक्ष, जैन